# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3974/शि.वि./2015
दि.23/04/2015

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथ., उच्च प्राथ. , माध्यमिक व उच्च माध्य. शाळांमध्ये महिलांकरीता तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत.**

**संदर्भ** :– 1)संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा., पूणे यांचे पत्र क्र प्रशिसं /मतनि/2015/1334–3006–4003/व्यय 1787 103 दि. 07.04.2015.
2) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परीपत्रक क्र. संकीर्ण 2014/प्र.क्र. 439/एस.एम.1 दि. 14.01.2015.
3) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे क्र. इएसटी2015/(35/15)/प्रशा–1 दि.24.02.2015

उपरोक्त संदर्भांकिंत विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महिला व मुलींवर होणाऱ्या लैंगीक शोषण किंवा अन्यायबाबत त्वरीत दखल घेण्याकरीता सर्व मनपा शाळांमध्ये महिला तक्रार निवारण समिती तयार करावयाची आहे. या समितीमध्ये आपल्या शाळेजवळील महिला मा. नगरसेविका मु.अ., शिक्षिका, विद्यार्थीनींची आई, महिला शाळा समिती सदस्य, परीसरातील महिला वकील व महिला पोलिस कर्मचारी यांचा समावेश करावा. संदर्भिंय शासन परीपत्रक व शासन पत्रान्वये राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. हे शासन निर्णय सोबत संलग्न असून त्यातील मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करून महिला तक्रार निवारण समिती तयार केल्याचा अहवाल कार्यालयात सादर करावा.

**सहपत्र** :– शासन निर्णय संलग्न आहे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

# प्राथमिक शिक्षण संचालनालय

डॉ. ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

दुरध्वनी (०२०) २६१२ १३ ९४
(०२०) २६१२ १३ ९६

फॅक्स (०२०) २६०५४१०३
ई-मेल : **depmah@gmail.com**


1787

क्र.प्राशिसं/मतनि/२०१५/१३३४-३००६-४००३/व्यव.१०३
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
म.रा.पुणे ४११ ००१
दिनांक -०७-०४-२०१५

21 APR 2015

प्रति,

**१) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**२) सर्व जिल्हा परिषदा**

**विषय - राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये, महिलांकरिता तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत**

संदर्भ:- १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१४/प्र.क्र.४३९/एस.एम.१ दिनांक १४ जानेवारी २०१५ (प्रत संलग्न)
२) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे क्र.इएसटी २०१५/(३६/१५)/प्रशा-१ दिनाक २४-०२-२०१५ चे पत्र (प्रत संलग्न)

संदर्भांकित शासन परिपत्रक व शासन पत्रान्वये राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच शाळांमध्ये पाठपुरावा करुन जिल्हयातील एकत्रित माहिती संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी त्यांचे विभागीय स्तरावरील संकलित करुन शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना तसेच शासनास सादर करण्याबाबतही निर्देश दिलेले आहेत.

तरी शासनाचे संदर्भांकित शासन परिपत्रक व शासन पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आपल्या विभागातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच आपल्या विभागातील शाळांमध्ये पाठपुरावा करुन जिल्हयातील एकत्रित माहिती संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करण्याबाबत व विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी त्यांचे विभागातील माहिती संकलीत करुन सदरची माहिती शिक्षण संचालक (प्राथमिक) व शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात यावे.

**(महावीर माने)**
**संचालक**
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
म.रा.पुणे १

प्रत मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग, मत्रालय, मुंबई ३२ यांना आवश्यक त्या माहितीसाठी सविनय सादर

शिक्षण संचालनालय
(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे १.
28 JAN 2015
आवक क्रमांक 1334
शाखा 103

(१)

राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये, महिलांकरिता तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासनपरिपत्रकक्रमांकः संकीर्ण २०१४/प्र.क्र.४३९/एस.एम.१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख:१४ जानेवारी, २०१५

103

संदर्भ -

१) शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संकीर्ण २०१०/(७६/१०)/प्रशा १, दिनांक ३१मार्च, २०१०

## परिपत्रक

महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी उपाययोजना सूचविण्याबाबत मा.न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून या समितीने सादर केलेल्या अंतरीम अहवालांमध्ये राज्यातील प्रत्येक शाळेत महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे तसेच न्यायालय स्तरावर, ग्रामपातळीवर, शाळा, महाविद्यालय स्तरावर व औद्योगिक आस्थापनांमध्ये महिलांकरिता तक्रार निवारण समिती स्थापन करणे या शिफारशी केल्या आहेत. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था, अध्यापक विद्यालये, शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यामध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याच्या सूचना यापुर्वीच संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी उपाययोजना सूचविण्याबाबत मा.न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीची शिफारस विचारात घेऊन, शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना सूचित करण्यात येते की, राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत सर्व संबंधितांना निदेश देण्यात यावेत. याप्रमाणे शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

३. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (माध्यमिक) यांना निदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जिल्हयातील, सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत शाळांमध्ये पाठपूरावा करावा आणि त्या

जिल्हयातील एकत्रित माहिती, संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना निदेशित करण्यात येते की, त्यांनी विभागीय स्तरावरील माहिती शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना तसेच शासनास सादर करावी.

४. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना सूचित करण्यात येते की, राज्यातील, सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याच्या कार्यवाहीचा आढावा घेऊन एकत्रित माहितीसह अहवाल शासनास तात्काळ पाठवावा.

५. सर्व संबंधितांनी वरील निदेश/सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०११५१४४११३८३२१असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2015.01.15 16:41:00 +05'30'

(स्वाती म.नानल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे,
३. संचालक, प्रौढ शिक्षण, पुणे
४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
५. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
७. निवड नस्ती, एस.एम १

महाराष्ट्र शासन

क्रमांक: इएसटी २०१५/(३६/१५)/प्रशा-१

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२
दिनांक २४ फेब्रुवारी,२०१५

शिक्षण संचालनालय
(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे १.
07 MAR 2015
आवक क्रमांक 3006
शाखा

प्रति,
आयुक्त,
शिक्षण,पुणे
आयुक्त,
क्रिडा , पुणे

विषय: - कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात "अंतर्गत तक्रार निवारण समिती "गठीत करणेबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्र.मकचौ २०१३/प्र.क्र.६३/मकक, दिनांक १९ जूल,२०१४

महोदय,

उपरोक्त विषयास अनुलक्षून आपणास कळविण्यांत येते की, केंद्र शासनाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळास (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ व नियम -९ डिसेंबर,२०१३ रोजी प्रसिध्द करण्यांत आला आहे. सदर अधिनियमांमधील तरतुदीनुसार प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक असून त्यानुसार समिती गठीत करण्याची योग्य ती कार्यवाही करावी. याबाबत महिला व बाल विकास विभागाने क्रमांक मकचौ२०१३/प्र.क्र.६३/मकक, दिनांक १९/०६/२०१४ चा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध केला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१४०६२०१०५९५०६०३० असा आहे.

२. उक्त अधिनियम व महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक १९/०६/२०१४ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार विधीचे ज्ञान असलेल्या व सामाजिक कार्याशी संबंधित संघटनेमधील सदस्यांचा समावेश प्रत्येक कार्यालयातील "अंतर्गत तक्रार निवारण समितीत " करणे आवश्यक असून आपल्या विभागांतर्गत कार्यरत सर्व कार्यालयांमध्ये त्याप्रमाणे समिती गठीत करावी ." अंतर्गत तक्रार निवारण समिती" नेमल्याबाबतची एक प्रत महिला व बाल विकास व या विभागास त्वरित सादर करावी तसेच समिती गठीत झाली नसेल तर त्वरित गठीत करण्यांत यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(र.प्र.आटे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे